वाचावे : पुरवठादारांकडुन दरपत्रके मागविण्याकरीता दिनांक 17.01.2026 रोजीची मंजूर कार्यालयीन टिपणी.

# जिल्हा व सत्र न्यायालय – जळगांव.

## जाहीर निविदा

जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव व न्यायालयाच्या अखत्यारीतील क.स्तर न्यायालयातील एकुण 16 झेरॉक्स मशिनकरीता दिनांक 01.12.2025 ते दिनांक 31.12.2025 या कालावधीकरीता सेवा संविदेचा करार करण्यात आलेला होता. तथापि सदरचा करार यापुढे सुरू ठेवणे गरजेचे असल्याने जिल्हा न्यायालय व जिल्हा न्यायालयाचे अखत्यारीतील न्यायालयांच्या 16 झेरॉक्स मशिनकरीता सेवा संविदेच्या कराराचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव व जिल्हा न्यायालयाच्या अखत्यारीतील तालुका न्यायालयातील शॉर्प कंपनीच्या एकुण 16 झेरॉक्स मशिनकरीता सेवा संविदेचा करार (Annual Maintenance Contract) पुरविणा–या पुरवठाकारांना या जाहीर निविदेद्वारे कळविण्यांत येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव व जिल्हा न्यायालयाच्या अखत्यारीतील तालुका न्यायालयाच्या उपयोगातील खालील नमुद करण्यात आलेल्या झेरॉक्स मशीन करीता सेवा संविदेचा करार करावयाचा आहे. तरी याकामी ज्या पुरवठाकारांना स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रके बंद पाकिटात म.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने पाकिटावर " झेरॉक्स मशीनचे सेवा संविदेचा करार " असे नमुद करुन पाकीटे म.प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कक्ष कमांक 101 मध्ये दिनांक 30/01/2026 पर्यत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून द्यावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दिनांक 31/01/2026 रोजी सकाळी 10.30 वाजता म. जिल्हा न्यायाधीश –1, जळगांव यांचे निजी कक्षात उघडले जातील.

2....

जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव व जिल्हा न्यायालयांच्या अखत्यारीतील तालुका न्यायालयातील शॉर्प कंपनीच्या झेरॉक्स मशिनींचा तपशिल खालीलप्रमाणेः—

| अ.क. | न्यायालयाचे नांव | झेरॉक्स मशिन शॉर्प मॉडेल क. |
|---|---|---|
| 1 | जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव. | शार्प 35 सीपीएम |
| 2 | जिल्हा व अति.सत्र न्यायालय, भुसावळ | शार्प 22 सीपीएम |
| 3 | मुख्य न्यायदंडाधिकारी, जळगांव | एआर 5726 |
| 4 | दिवाणी न्यायालय व. स्तर, जळगांव | शार्प 22 सीपीएम |
| 5 | दिवाणी न्यायालय व. स्तर, भुसावळ. | शार्प 22 सीपीएम |
| 6 | सहदिवाणी न्यायालय व स्तर, चाळीसगांव. | शार्प 22 सीपीएम |
| 7 | दिवाणी न्यायालय क. स्तर, धरणगांव. | शार्प 22 सीपीएम |
| 8 | दिवाणी न्यायालय क.स्तर, पाचोरा | एआर 5516 |
| 9 | दिवाणी न्यायालय क.स्तर, रावेर | एआर 5516 |
| 10 | दिवाणी न्यायालय क.स्तर, एरंडोल | एआर 5520 डी. |
| 11 | दिवाणी न्यायालय क.स्तर, चोपडा | एआर 5520 डी. |
| 12 | दिवाणी न्यायालय क.स्तर, पारोळा | एआर 5520 डी. |
| 13 | दिवाणी न्यायालय क.स्तर, मुक्ताईनगर | एआर 5520 डी. |
| 14 | दिवाणी न्यायालय क.स्तर, जामनेर | एआर 5620 डी. |
| 15 | दिवाणी न्यायालय क.स्तर, यावल | एआर 5620 डी. |
| 16 | दिवाणी न्यायालय, क.स्तर, बोदवड | एआर 5618 एन. |

## सर्वसाधारण अटी.

1. दरपत्रक स्विकृत केल्यावर सेवा संविदेचा करार आदेश दिल्यानंतर दि.01.02.2026 ते दि.31.01.2027 मुदत 01 वर्ष वैध राहील. तसेच सदरील कालावधी करीता रूपये 100/— च्या बॉण्डपेपरवर करारनामा करावा लागेल.

2. दरपत्रके बंद पाकीटात म.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने पाकिटावर 'झेरॉक्स मशीनचे सेवा संविदेचा करार " असे नमुद करुन पाकीट प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कक्ष कमांक 101 मध्ये दिनांक 30/01/2026 पर्यत संध्याकाळी 05.30 वाजेपावेतो कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी स्पीड पोस्टाने/कुरीयर/स्वतः समक्ष किंवा आपल्या कार्यालयाचे प्रतिनिधी मार्फत सादर करावीत.

3. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यात आलेला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.

4. दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटीचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस अधीन राहून दरपत्रक दयावे लागेल तसेच बिलाची रक्कम अदा करताना नियमानुसार टी.डी.एस. कपात करण्यांत येईल. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

3....

5. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा–यांनी स्वतः अथवा प्रतिनिधी उपस्थित राहण्याची मुभा राहील अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील.

6. नमुद सेवा पुरवठा आदेश देवूनही पुरवठा मुदतीत न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

7. दरकराराची रक्कम दर सहा महिन्यांनी ठरलेल्या रक्कमेच्या निम्मे अधिक जीएसटी टॅक्ससह अदा केली जाईल.

8. मशिन नादुरुस्त झालेबाबत आपणांस कळविल्यानंतर 48 तासाच्या आंत मशिन दुरुस्त करुन दयावी लागेल.

9. जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव व उपरोक्त नमुद अखत्यारीत असलेले तालुका न्यायालयात दरमहा नियमीत भेट देवुन झेरॉक्स मशिनची पहाणी करण्यात यावी.

10. वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास तात्काळ करार रददबातल होईल.

11. कराराच्या कालावधीमध्ये कोणत्याही वेळी कोणतेही कारण न देता करार रदद करणेचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखुन ठेवलेला आहे.

12. झेरॉक्स मशिनची कोणतीही दुरूस्ती केल्यास त्याची नोंद लॉगबुकवर घेवुन दुरूस्ती अहवालावर संबंधीत कर्मचा–याचे समाधान झाल्यांनतर दुरूस्ती केल्याची स्वाक्षरी घ्यावी.

13. शासकिय सुटीचे दिवशी आवश्यकता पडल्यास व सुचना मिळाल्यास त्वरीत मशीन दुरूस्त करणे बंधनकारक राहील.

14. कोणत्याही प्रकारचे आगाऊ रक्कमेचे प्रदान केले जाणार नाही.

म.जा.क. /५०२/ 2026
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक 22/01/2026.

प्र. प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव.

<u>प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.</u>
1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधीश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. जिल्हा न्यायालय, जळगांव यांच्या संकेतस्थळावर